आंतरराष्ट्रीय
महिला दिन
विशेषांक

# प्रेरक ललकारी

स्त्री मुक्ती संघटनेचे नियतकालिक



स्त्री मुक्ती संघटना


• वर्ष : छत्तीसावे • अंक : ३-४
• महिना : मार्च-एप्रिल २०२२
• मूल्य : ₹ १० • पृष्ठे : ९६


पददलितांची पिळवणुकीतून मुक्ती व्हावी हा एकाच ध्यास । मनी घेउनी जाऊ आपण निर्मु आपुला नवा समाज॥

## प्रेरक ललकारी

**स्त्री मुक्ती संघटनेचे नियतकालिक**

**संपादक :** शारदा साठे

**संपादक मंडळ**

ज्योति म्हापसेकर

अमोल केरकर

वृषाली मगदूम

अरविंद वैद्य

करुणा गोखले

योगिनी राऊळ

**मुद्रक व प्रकाशक**
शारदा साठे,
विश्वस्त, स्त्री मुक्ती संघटना
३१ श्रमिक, रॉयल क्रेस्ट, लोकमान्य टिळक वसाहत मार्ग क्र.३, दादर, मुंबई ४०००१४
दूरध्वनी : २४१७४३८१
www.streemuktisanghatana.org
E-mail : smsdadar@gmail.com

**वितरण** : मर्यादित, स्त्री मुक्ती संघटना सदस्यांसाठी खाजगी वितरण

**मुखपृष्ठ व आतील चित्रे :** अमृता ढगे

**अक्षरजुळणी व मांडणी** : उज्वला तावडे

**वार्षिक वर्गणी** : रु. १००/-

**मासिक** : रु.१०/–

**आजीव वर्गणी** : रु.१०००/–

कृपया वर्गणी रोख, मनीऑर्डर, डी.डी., चेक अथवा बँकेत ऑनलाईन पाठवावी. डी.डी./ चेक 'स्त्री मुक्ती संघटना' नावाने बँकेच्या मुंबई शाखेचा पाठवावा.



अंकात व्यक्त होणारी मते संघटनेची अधिकृत मते असतीलच असे नाही.


# अंतरंग


| | | |
|---|---|---|
| संपादकीय | | ४ |
| भारताचा इतिहास कसा समजून घ्यायचा? | कुमार केतकर | ५ |
| जग आणि भारत | अमोल केरकर | १० |
| भारतीय शेती - वाटचाल आणि आव्हाने | जयंती काजळे | १७ |
| भारतीय अर्थव्यवस्थेची बांधणी | सुरेश धोपेश्वरकर | २३ |
| आरोग्यसुविधा लोकांना कशा मिळणार? | स्वातिजा मनोरमा | २९ |
| दलित चळवळीची ७५ वर्षे | अजित मगदूम | ३५ |
| मंगळसूत्र | सुरेश लोटलीकर | ४० |
| उठाठेव कुंकवाची | राजा पटवर्धन | ५० |
| मारिया आणि लेले | शिल्पा कांबळे | ५३ |
| स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्य | डॉ. अनिल सपकाळ | ६३ |
| माझे वय वीस | अलका पावनगडकर | ७० |
| मोडके स्वातंत्र्य | भगवान निळे | ७६ |
| अल्पजीवी दलित पँथर | सुरेश सावंत | ७८ |
| आभासी दुनियेचे आव्हान | सुनिल गजाकोश | ८३ |
| सुवर्णमहोत्सवी वर्षानंतरच्या भारतातला मी | अभिषेक गिजरे | ९० |


# कविता


| | | |
|---|---|---|
| राजपथावर साक्षात लोकच येणार म्हणून | मोहन देस | २८ |
| बाईचं राबणं | माया अँजेलू | ५२ |
| बायका जमतात | प्रतिभा सराफ | ५२ |
| माणसं पळताहेत जीवाच्या आकांताने | योगिनी राऊळ | ६२ |
| हे नारी तू कुठे आहेस...? | वर्षा मारुती भिसे | ९३ |
| विचारगंध | गीतेश गजानन शिंदे. | ९३ |

# भारतीय शेती - वाटचाल आणि आव्हाने

**जयंती काजळे**

भारताच्या अर्थव्यवस्थेमध्ये शेतीक्षेत्राचे स्थान पाठीच्या कण्यासारखे आहे, असे नेहमी म्हटले जाते. ज्याप्रमाणे भक्कम पाठीचा कणा शरीराला आधार देतो त्याप्रमाणे शेती क्षेत्रही अर्थव्यवस्थेला विविध प्रकारे आधार देत असते. शेतीवर अवलंबून असलेल्या कुटुंबांना उदरनिर्वाहाचे साधन पुरवणे आणि कृषिमालाचा म्हणजेच अन्नपुरवठा करणे यातून संपूर्ण अर्थव्यवस्थेला आधार मिळतो. या कार्यात जर आसमानी किंवा इतर संकटांमुळे खंड पडला, म्हणजेच कृषि मालाचा पुरवठा कमी झाला किंवा शेतीतील कुटुंबांना पुरेसे उत्पन्न मिळेनासे झाले तर त्याचे पडसाद संपूर्ण अर्थव्यवस्थेमध्ये उमटतात. स्वातंत्र्यापूर्वी भारतीय अर्थव्यवस्था शेतीप्रधान होती. जवळ जवळ ७० टक्के लोक उदरनिर्वाहासाठी शेतीवर अवलंबून होते. व्यवसायांचे विविधिकरण झालेले नव्हते. उद्योगधंदे आणि सेवा क्षेत्रात काम करणारे श्रमजीवी तुलनेने कमी होते. शेतीवरील अवलंबित्व जास्त असले तरी शेतीमध्ये उत्पादनक्षमता कमी होती आणि शेतकऱ्याला पुरेसे उत्पन्न मिळणे शक्य होत नव्हते. शेतीमध्ये सुधारणा घडवून आणण्याबाबत वासाहतिक शासनसत्ता उदासीन होती. संपूर्ण शेती निसर्गावर विसंबून असल्यामुळे शेतीचा विकास झाला नाही. त्याच्या परिणामी जवळजवळ ५०टक्के जनता दारिद्र्य रेषेखाली राहिली.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मात्र सरकारी पातळीवर विविध योजना सुरू झाल्या. आर्थिक नियोजनाला चालना मिळाली. शेतीच्या विकासाला प्रोत्साहन मिळाले. गेल्या ७५ वर्षांत आपण टंचाईकडून मुबलकतेकडे वाटचाल केली आहे. ही प्रगती निश्चितच स्पृहणीय आहे. परंतु प्रगतीचा आलेख बघायचा तर केवळ अन्नधान्य उत्पादनातली वाढ बघून चालणार नाही. शेतीवर अवलंबून असलेल्या जनतेला आजही अनेक आव्हाने पेलावी लागतात. आजही शेतीकडे बेभरवशाचा व्यवसाय म्हणूनच बघितले जाते. भारतामध्ये अनेक पिकांचे सरासरी हेक्टरी उत्पादन इतर देशांच्या तुलनेने खूपच कमी आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आजपावेतो भारतीय शेती विकासाच्या कुठल्या पायरीवर पोहोचली आहे, कोणत्या आव्हानांचाा सामना करत आहे, कोणते उपाय योजवे लागणार आहेत ते आपण पाहणार आहोत.

### शेती उत्पादन

१९५०च्या सुमारास अन्नधान्याचे (तृणधान्य व कडधान्य) एकूण वार्षिक उत्पादन पाच कोटी टन होते आणि माणशी उपलब्धता १४४ किलो होती. वाढत्या लोकसंख्येसाठी हे पुरेसे नव्हते. त्यामुळे अन्नधान्याची आयात करणे ही मोठी गरज होती. इतरही अनेक अन्नपदार्थांची देशात टंचाई होती. दुष्काळात साठवणुकीतल्या अन्नधान्याचे जनतेमध्ये वाटप करण्याची शासनयंत्रणेत क्षमता नव्हती.

१९६० च्या दशकात जास्त उत्पादन देणारे गहू आणि तांदळाचे सुधारित बीज मिळाले. सुधारित बीज, रासायनिक खते आणि पाणी यांच्या संयुक्त वापरामुळे हेक्टरी उत्पादकता वाढली. उत्पादनातही मोठ्या प्रमाणात वाढ झाली. यालाच आपण हरितक्रांती असे संबोधतो. २०२०/२१ च्या आकडेवारीनुसार भारताचे अन्नधान्य उत्पादन ३० कोटी टनापेक्षा जास्त आहे. तसेच अन्नधान्याची वार्षिक माणशी उपलब्धता १८७ किलो आहे. सरकारकडचा अडीअडचणीसाठी ठेवलेला अन्नधान्यसाठा (बफर स्टॉक) ओसंडून वाहत आहे. कोव्हिड काळात देशात सुमारे ८०कोटी लोकांना दरमहा मोफत ५ किलो धान्य पुरवठा ह्याच साठ्यातून होतो आहे.

हरित क्रांतीनंतर फळे, भाज्या, नगदी पिके अशा इतर शेतीमालाचेही उत्पादन वाढू लागले. तसेच देशाच्या भौगोलिक वैविध्याचा फायदा घेत वेगवेगळ्या भागांत विविध प्रकारची पिके घेऊन उत्पादनात वाढ करणे शक्य झाले. जसजसे सरासरी उत्पन्न आणि विविध उपभोग्य वस्तूंची गरज वाढू लागली तसतसे अनेक प्रकारच्या शेतमालाचे आणि शेतीसंलग्न मालाचे उत्पादन वाढू लागले.

लागवडीयोग्य जमिनीची

उपलब्धी बघता भारताचा जागतिक क्रमवारीत दुसरा क्रमांक आहे. अनेक पिकांच्या उत्पादनात भारताचा जगात पहिला/ दुसरा क्रमांक आहे. उदा. २०१८च्या आकडेवारीनुसार डाळींचे उत्पादन सर्वात जास्त भारतात होते आणि तांदूळ आणि गव्हाच्या बाबतीत भारताचा क्रमांक दुसरा आहे. अनेक फळे, भाज्या तसेच दुधाचे उत्पादनही सर्वात जास्त भारतात होत आहे.

शेतमालाची निर्यातही तुलनेने वाढली आहे. बासमती तांदूळ, साखर, मसाले आणि काही प्राणीजन्य पदार्थ या महत्त्वाच्या निर्यातीच्या वस्तू आहेत. कोविड काळात म्हणजे २०१९/२० मध्ये शेतमालाची निर्यात कोविडपूर्व काळाच्या तुलनेत (२०१७/१८ आणि २०१८/१९ ) मोठ्या प्रमाणात वाढली. अनेक अविकसित आणि काही विकसित देशांमध्ये कोविड काळातील अडचणींमुळे अन्नधान्याचा तुटवडा जाणवला. तेव्हा मोठ्या प्रमाणात भारतातून गहू, तांदूळ आणि इतर काही शेतीमालाचा पुरवठा केला गेला. म्हणजेच आंतरराष्ट्रीय बाजाराशी आपले शेतकरी कुटुंब जोडले गेले आहे. केवळ देशांतर्गतच नाही, तर आंतरराष्ट्रीय मागणीही शेती क्षेत्रातून पुरवली जात आहे.

शेतीच्या ह्या दृश्य विकासाचे फायदे खाली म्हणजेच शेतकरी कुटुंबांपर्यंत पोहोचले आहेत का हा अर्थातच कळीचा मुद्दा आहे. आजही बहुसंख्य अल्पभूधारक शेतकरी कुटुंबांना, शेती व्यवसायामधून पुरेसे वार्षिक उत्पन्न मिळेल याची खात्री नाही. अनेक प्रश्न समोर उभे आहेत. पिकांचे एकूण उत्पादन जरी वाढत असले तरी अनेक पिकांची दर हेक्टरी उत्पादकता कमी आहे. या पार्श्वभूमीवर अर्थव्यवस्थेची विविध वैशिष्ट्ये, शेतीविषयक धोरणे आणि प्रचलित शेतीविषयक कायदे यामुळे शेतीसमोर कोणती आव्हाने उभी आहेत याची चर्चा करणे आवश्यक आहे.

### अर्थव्यवस्थाः संरचना, वैशिष्ट्ये आणि शेती

स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय अर्थव्यवस्थेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य डोळ्यासमोर येते. ते म्हणजे शेती आणि बिगरशेती क्षेत्रात उपजीविकेसाठी अवलंबून असलेल्या व्यक्तींचे प्रमाण. १९५०मध्ये एकूण श्रमजीवींपैकी ७० टक्के शेतीमध्ये होते. त्यात हळू हळू घट होत गेली. तरीही आज हे प्रमाण ५० टक्क्यांच्या आसपास आहे. थोडेसे खोलात शिरून फक्त ग्रामीण भागाचा विचार केला, तर एका अभ्यासानुसार २०११/१२ साली ६४ टक्के श्रमजीवी शेतीमध्ये काम करत होते. तर उर्वरित ३६ टक्के श्रमजीवी अन्य क्षेत्रात होते. आश्चर्याची गोष्ट अशी की ग्रामीण भागातील ६४ टक्के श्रमजीवी संपूर्ण ग्रामीण उत्पन्नाच्या केवळ ३९ टक्के उत्पन्नाची निर्मिती करत होते. रोजगार आणि उत्पन्नाचे हे व्यस्त प्रमाण शेतीची उत्पादकता कशी कमी आहे आणि त्यामुळे शेतीमधील श्रमजीवींचे उत्पन्नही तुलनेने कसे कमी आहे ह्याचेच निर्देशक आहे. स्वातंत्र्योत्तर काळात शेती उत्पादन वाढले. परंतु हेसुद्धा खरेच आहे की शेती क्षेत्राच्या वाढीचा वार्षिक दर नेहमीच कमी म्हणजे चार टक्क्याच्या खाली राहिला



आहे. त्या तुलनेत उद्योगधंदे आणि सेवा क्षेत्राच्या वाढीचा सरासरी दर मात्र ५ टक्क्यांहून जास्त होता. गेल्या अनेक वर्षांच्या आकडेवारीवरून दिसून येते की जेव्हा जेव्हा शेती क्षेत्राचा वाढीचा दर ४ टक्क्यांचा आसपास पोहोचला, तो केवळ भाजीपाला, फळे आणि शेतीसंलग्न प्राणीजन्य पदार्थांच्या उत्पादनवाढीमुळे.

एखादी शेतीप्रधान अर्थव्यवस्था जशी वाढू लागते, जनतेचे उत्पन्न वाढू लागते आणि अर्थव्यवस्थेचा विकास होऊ लागतो तसे शेतीशी संबंधित क्षेत्रे आणि बिगरशेती उद्योगधंदे वाढू लागतात. शेतीमधील रोजगार निर्मितीला मर्यादा आहेत. त्यामुळे शेतीवर अवलंबून असलेले श्रमजीवी हळू हळू वाढणाऱ्या इतर क्षेत्रांवर निर्वाहासाठी अवलंबून राहू लागतात. ही वाढणारी क्षेत्रे म्हणजेच विविध वस्तूंचे उत्पादन करणारे व्यवसाय व उद्योगधंदे आणि विविध सेवा (बँकिंग, शिक्षण, मनोरंजन इत्यादी) ह्या क्षेत्रांमध्ये रोजगारनिर्मिती होऊ लागते. परिणामी त्यांचा राष्ट्रीय उत्पन्नामधील एकूण वाटाही वाढू लागतो. परंतु अशी रोजगारनिर्मिती एखाद्या विकसनशील देशात पुरेशा प्रमाणावर झालीच नाही, तर शेतीवर अवलंबून असलेल्या कुटुंबांना शेतीतून बाहेर पडून बिगर शेती क्षेत्रात रोजगाराची संधी मिळत नाही. अशा परिस्थितीत शेतीवर तुलनेने जास्त लोक अवलंबून असले तरी राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा वाटा कमी असू शकतो. त्याचप्रमाणे बिगरशेती क्षेत्रातील कामकऱ्यांना मिळणारे सरासरी उत्पन्न अधिक असले तरीही जीवनमान मात्र शेतीसारखे, निम्न स्तरावरचे, अशी विचित्र परिस्थिती निर्माण होते. अशी परिस्थिती भारतामध्ये आपल्याला दिसून येते.

रोजगार निर्मितीच्या मंद गतीमुळे ग्रामीण कष्टकऱ्यांना बिगरशेती क्षेत्राने मोठ्या प्रमाणावर सामावून घेतलेले नाही. त्यामुळेच महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी (मनरेगा) हा ग्रामीण रोजगार निर्मितीचा कार्यक्रम आज शेकडो कुटुंबांना वर्षातील काही दिवस रोजगार पुरवीत आहे. रोजगार निर्मितीमधील अपयशामुळे देशातील मनुष्यबळ अजूनही शेतीवरच गुजराण करते. कोविडसारख्या नैसर्गिक आणि नोटबंदीसारख्या मानवनिर्मित संकटकालीन परिस्थितीमध्ये अजूनही गावी परतणाऱ्या लोकांचे शेतीवरच भरणपोषण होते. म्हणूनच शेती क्षेत्राच्या आणि शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी बिगरशेती क्षेत्रात रोजगार निर्मिती करणे, निरनिराळ्या शेती माल प्रक्रिया उद्योगांना चालना देणे महत्त्वाचे आहे.

अर्थव्यवस्थेच्या मनुष्यबळ संरचनेव्यतिरिक्त शेतीक्षेत्रासमोर प्रगतीच्या आड येणारी विशिष्ट अशी अनेक आव्हाने आहेतच. गेल्या काही वर्षांच्या आकडेवारीतून प्रकर्षाने जाणवणारी बाब म्हणजे जमिनीचे झपाट्याने होत चाललेले तुकडीकरण आणि त्यामुळे शेतकऱ्यांच्या वाट्याला येणारा जमिनीचा लहानसा तुकडा. १९७०/७१ साली भारतात कृषी जनगणना झाली. त्यानुसार देशात १६२०लाख हेक्टर्स उपजाऊ कसली जाणारी जमीन होती, तर जमिनीचे तुकडे होते ७१० लाख. २०१५/१६मध्ये उपजाऊ जमिनीचे आकारमान १५७८ लाख हेक्टर्स म्हणजे ४८लाख हेक्टर्सने कमी झाले. पण जमिनीच्या तुकड्यांची संख्या मात्र दुप्पट म्हणजे १४६५ लाख झाली. साहजिकच धारण जमिनीचा सरासरी आकार २.२८ हेक्टर्सवरून गेल्या ४५ वर्षात कमी कमी होऊन २०१५/१६ साली तो १.०८ हेक्टर्सइतका खाली आला.

दर वर्षी हमी भाव जाहीर करणाऱ्या 'कमिशन फॉर ॲग्रीकल्चरल कॉस्ट अँड प्राईसेस'च्या २०२१/२२च्या अहवालानुसार एका हेक्टरचे भाताचे, सोयाबीनचे आणि उसाचे खर्च वजा जाता देशातील सरासरी वार्षिक उत्पन्न अनुक्रमे ३२५१६रुपये, १३५०८ रुपये आणि १,३४,४५५ रुपये होते. म्हणजेच या पिकांच्या उत्पादनातून दरमहा अनुक्रमे केवळ २७१० रुपये, ११२६ रुपये, ११२०५ रुपयेइतकेच उत्पन्न मिळेल. पर्यायी रोजगार संधींचा अभाव यातून दिसून येतो. या पार्श्वभूमीवर मर्यादित साधनांच्या जोरावर छोट्या जमिनीत पिके घेणे आणि येणाऱ्या उत्पादनातून पूर्ण कुटुंबाला वर्षभर पुरेल इतके उत्पन्न मिळवणे आणि भविष्यातील प्रगतीसाठी गुंतवणूक करत राहणे हे मोठेच आव्हान अल्पभूधारक शेतकऱ्यांसमोर म्हणजेच संपूर्ण शेतीक्षेत्रासमोर उभे ठाकले आहे.

लोकसंख्या आणि आकार पाहता

मोठ्या राज्यांमध्ये देशाच्या विविध भागांत शेतीच्या विकासाचे टप्पेही वेगवेगळे आहेत. त्यामुळे शेतीसमोरील स्थानिक प्रश्न आणि आव्हानेही वेगवेगळी आहेत. पंजाबसारख्या शेतीक्षेत्रात सर्वात पुढे असलेल्या राज्यात गहू आणि तांदूळ ही पिके प्रामुख्याने घेतली जातात. आणि उत्पादनही अधिक आहे. परंतु पाणी, खते आणि वीज यावर दिलेल्या अनुदानामुळे त्यांचा अवास्तव वापर होत आहे. त्यामुळे जमिनीची गुणवत्ता आणि सुपीकतेवर प्रतिकूल परिणाम झालेला आहे. इतर अनेक राज्यामध्ये पीकपद्धतीमध्ये विविधता आहे. धान्याव्यतिरिक्त फळे व भाजीपाला अशी पिके अनेक राज्यांमध्ये घेतली जातात. तसेच पशुधनावर आधारित व्यवसायही शेतकरी करतात. ईशान्येकडील राज्यांमध्ये फळे, भाज्या, तांदूळ यांचे उत्पादन करण्याची आणि त्यापासून फायदा मिळवण्याची कुवत आहे. शेतकरी समाज जात, धर्म, जमिनधारणा यानुसारही विभागलेला आहे. विविधता आणि विकास दरातील विषमता ही भारतीय समाजाची आणि शेतीचीही वैशिष्ट्ये आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी आखलेली प्रत्येक, विशेषत: केंद्रीय, योजना प्रत्येक राज्यात आणि गावात सारख्याच पद्धतीने यशस्वीरीत्या राबविली जाईल व परिणामकारक ठरेल असे नाही. त्यामुळे प्रादेशिक व स्थानिक शेती प्रश्नांच्या अनुषंगाने धोरणे आखणे आणि अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

### भारताचे शेतीविषयक धोरण

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात भारतीय शेती धोरणाचे लक्ष नेहमीच अन्नधान्य सुरक्षा तसेच ग्राहकांच्या हितावर केंद्रित झालेले आहे. त्यामुळे शेतमालाचा बाजार आणि शेतमालाच्या किमती वर्षानुवर्षे नियंत्रणाखाली राहिल्या आहेत. बाजारभाव वाढू लागले की विविध उपाययोजनांद्वारे शेतमालाच्या किमती नियंत्रित करून ग्राहकाचे हित जपण्याचे धोरण कायम अवलंबिले गेले. विविध अभ्यास असे दर्शवितात की अशा धोरणांमुळे शेतकऱ्याला मिळणाऱ्या किमती बरीच वर्षे दबलेल्या राहिल्या. उत्पादन वाढत गेले तरी शेतकऱ्याचे सरासरी उत्पन्न अथवा नफा वाढून त्यामुळे शेती क्षेत्रामध्ये गुंतवणुकीला प्रोत्साहन मिळेल असे वातावरण निर्माण होऊ शकले नाही. अजून एक मुद्दा असा की शेतीसाठी पूरक म्हणजे सिंचन, दळणवळण, मालाची गोदामे ह्यामध्ये सरकारी गुंतवणूक वाढली की खाजगी गुंतवणुकीलाही प्रोत्साहन मिळते. परंतु सार्वजनिक गुंतवणुकीत अनेक वर्षे पुरेशी वाढ न झाल्याने त्याचा विपरीत परिणाम खाजगी गुंतवणुकीवर झाला. किंमत बांधून देण्याच्या धोरणामुळे शेतकऱ्यांचे होणारे नुकसान भरून काढण्यासाठी आणि उत्पादन खर्च कमी करण्यासाठी सरकारी पातळीवरून खते, बियाणे, वीज, पाणी यासाठी अनुदाने देण्याच्या धोरणाचे पालन केले गेलेले दिसून येते. परंतु अशा धोरणांचे अथवा सरकारी खर्चाचे शेतकऱ्यांचे उत्पन्न, नफा, गुंतवणूक यावरील परिणाम तात्पुरते किंवा अल्पकालीन असतात. तसेच अनुदाने दिल्यामुळे स्वस्तात मिळालेल्या खतांचा आणि पाण्याचा अतिवापर होऊन त्यामुळे जमिनीचे नुकसान होते असेच विविध अभ्यास सांगतात..

भरमसाठ अनुदान दिल्याने शेतकऱ्यांचा विकास साधण्यास मर्यादा आहेत. गेल्या काही वर्षांमध्ये सरकारी पातळीवरून जाहीर होणाऱ्या हमी भावाच्या किमती हळू हळू वाढत आहेत. बाजारभाव हमी भावाखाली कोसळल्यास सरकार जाहीर केलेल्या हमी भावाला शेतमाल विकत घेणार हे आश्वासन हमी भावातून मिळते. शिवाय दर वर्षी वाढणाऱ्या हमी भावाचा शेतकऱ्यांना दिलासा असतोच. परंतु हमी भावाच्या सरकारी पातळीवरून केलेल्या वाढीलाही मर्यादा आहेत. तसेच हमी भाव जाहीर केले तरी त्या भावाला शेतमालाची खरेदी करण्यासाठी सरकारी यंत्रणा तयार नसेल ( उदा. गोदामे उपलब्ध नसतील) तर शेतकऱ्याचा माल हमी भावाला विकला जाणे अवघड बनते. त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी हमी भावाव्यतिरिक्त इतर अनेक बाबींकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

### कायदे आणि भारतीय शेती

संस्थात्मक बांधणी आणि कायद्यांच्या चौकटीमध्ये अर्थव्यवस्थेचे वेगवेगळे भाग काम करत असतात. कालानुरूप यामध्ये बदल होणे अर्थातच गरजेचे असते. शेती क्षेत्रही

याला अपवाद नाही. स्वातंत्र्योत्तर काळात झालेल्या शेतजमीन मालकी संदर्भातील सुधारणा आणि त्याअंतर्गत पारित झालेले कायदे यांचा प्रमुख उद्देश अतिरिक्त शेतजमिनीचे शेतमजूर व अल्पभूधारक शेतकरी यांना वाटप करणे तसेच प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्याच्या पिळवणुकीला आळा बसावा म्हणून जमीन भाड्याने देण्यावर निर्बंध आणणे हा होता. त्यानुसार साठीच्या आणि सत्तरीच्या दशकांमध्ये निरनिराळ्या राज्यांमध्ये शेतजमीन भाड्याने देण्यावर बंदी अथवा निर्बंध आले.

काळाच्या ओघात या नियंत्रण चौकटीमुळे अनेक प्रश्न उभे राहिले आहेत. भाड्याने जमीन कसण्यासाठी देण्यावर कायद्याने बंदी असल्यामुळे आज अनेक राज्यांमध्ये जमीन अनौपचारिक पद्धतीने भाड्याने दिली जाते. त्यामुळे जमीन कसणाऱ्याला पीक कर्ज किंवा गुंतवणुकीसाठी कर्ज आणि विविध सरकारी योजनांचे लाभ मिळत नाहीत. कायद्यामध्ये अनेक जाचक तरतुदी असल्याने अनेक ठिकाणी जमीन भाडेपट्ट्याने दिली जात नाही त्यामुळे अनेक जमिनी पडीक आहेत. तसेच स्वत:च्या जमिनीला भाड्याने घेतलेल्या जमिनीची जोड देऊन शेती उत्पादन आणि उत्पन्न वाढवणे हेही अल्पभूधारक कुटुंबांसाठी जिकिरीचे बनले आहे. अशा अडचणींमुळे बदलत्या काळानुसार जमीनविषयक कायद्यांमध्ये जमीनमालक आणि भाड्याने कसणारा शेतकरी या दोन्ही बाजूंचे हित जपण्यासाठी योग्य बदल करणे आवश्यक झाले आहे. २०१६ साली नीती आयोगाने या संदर्भात आदर्श कायद्याचा मसुदा (मॉडेल अग्रिकल्चर लँड लीजिंग ॲक्ट) तयार केला आहे. यावर चर्चा होऊन कायदा पारित होणे आवश्यक आहे. ही चर्चा घडवून आणण्यासाठी राज्य सरकारांनी पुढाकार घेणे उचित ठरेल.

दुसरी नियंत्रण चौकट म्हणजे शेतमालाच्या विक्री संदर्भातील कायदे. साठीच्या दशकात शेतमालाच्या विपणन व्यवस्थेसाठी नियंत्रित बाजाराची कल्पना पुढे आली. या संकल्पनेनुसार प्रत्येक राज्यात कृषि उत्पन्न बाजार समित्या अस्तित्वात आल्या. या समित्यांच्या अखत्यारीतील मार्केट यार्डमध्ये शेतमाल विकणे शेतकऱ्याला बंधनकारक झाले, कारण त्या वेळची परिस्थिती वेगळी होती. गरीब, अशिक्षित आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांची शेतमाल विकताना किमती आणि वजन यामध्ये व्यापाऱ्यांकडून फसवणूक होऊ नये ही त्यामागची भूमिका होती. सरकारी नियंत्रणाखालच्या मार्केट यार्डमध्ये शेतमाल विकणे बंधनकारक करून शेतकऱ्याला संरक्षण पुरवण्यात आले.

बाजार समित्यांमध्ये लिलाव पद्धतीने शेतमालाची विक्री होते आणि परवानाधारक व्यापारी, अडतदार तो माल विकत घेतात. कालांतराने या पद्धतीमध्ये व्यापारी आणि अडतदारांचे वर्चस्व निर्माण झाले, राजकारण सुरू झाले. बहुतांश समित्या उत्पन्न वापरून मार्केट यार्डमध्ये पायाभूत सुविधा निर्माण करण्यात आणि आधुनिक होण्यात कमी पडल्या. अशा परिस्थितीत एकीकडे शेतमालाला फायदेशीर किंमत मिळणे आणि मार्केट यार्डच्या सेवा सुविधा मिळणे शेतकऱ्यांसाठी अवघड होत गेले, तर दुसरीकडे शेतमाल बाजार समितीच्या मार्केट यार्डमध्येच विकण्याचे आणि सेवा शुल्क भरण्याचे बंधन शेतकऱ्यावर आले. म्हणजेच तोंड दाबून बुक्क्याचा मार ही परिस्थिती शेतकऱ्यांवर आली. त्यामुळे शेतमाल विपणन व्यवस्थेमध्ये बदल करण्याची निकड आज जाणवू लागली आहे. शेतमालाच्या विक्रीसाठी केवळ सरकारी संस्थांवर अवलंबून राहण्यापेक्षा कायद्याच्या चौकटीमध्ये खाजगी क्षेत्र शेतकऱ्यांना विक्रीसाठी खुले करून जिथे चांगला भाव मिळेल तिथे- देशांतर्गत आणि देशाबाहेरही विक्री करण्याचे स्वातंत्र्य असणे आणि त्यासाठी शेतकऱ्यांना सक्षम बनवणे याची आता नितांत गरज आहे.

गेल्या १५वर्षांपासून चर्चेत असलेल्या आणि २०२० साली केंद्रीय पातळीवर पारित झालेल्या व नंतर शेतकरी आंदोलनामुळे मागे घेतलेल्या शेतीविषयक तीन कायद्यांचा हेतू शेतमालाच्या विपणनामध्ये सुधारणा घडवून शेतकऱ्याला विक्री स्वातंत्र्य देणे हा होता. नवीन कायदे कधी होतील ते माहित नाही. आज शेतमाल साठवणुकीसाठी गोदामे, शीतगृहे, शेतमाल वाहून नेण्यासाठी योग्य तापमान असलेली वाहने व इतर अनेक सुविधा यामध्ये मोठ्या प्रमाणात

गुंतवणुकीची गरज आहे. शेतमालाच्या मागणीचे स्वरूप आता बदलले आहे. उंचावलेले जीवनमान, शहरीकरण आणि इतर अनेक कारणांमुळे लोक केवळ गहू-तांदूळ-डाळींचा आहार घेण्यापेक्षा फळे, भाज्या, प्राणीजन्य पदार्थ, विविध प्रक्रिया केलेले पदार्थ लोक खात आहेत. भारतीय शेतमालाला परदेशांतूनही मागणी आहे. त्याची पूर्तता करण्यासाठी भांडवल गुंतवणूक आवश्यक आहे.

### शेतीची पुढची वाटचाल

पारंपरिक पद्धतीने अनुदाने देऊन आणि हमी भावाचे धोरण राबवून शेतकऱ्याचे उत्पन्न टिकवून ठेवण्यासाठी संरक्षण मिळतेच. याशिवाय भविष्यातील प्रगतीसाठी शेतीमधील गुंतवणूक वाढविणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी सुयोग्य आणि काळानुरूप कायदे करून मूलभूत सुधारणा घडवून आणणे पाहिजेत. त्याला पर्याय नाही. तसेच या चौकटीतून अनिर्बंध खाजगी व्यापार आणि सरकारी एकाधिकारशाही ह्या दोन्ही टोकाच्या विचारधारा बाजूला ठेऊन व्यावहारिकदृष्ट्या अर्थपूर्ण अशी शेती उत्पादन आणि व्यापाराची मॉडेल्स निर्माण करणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ शेतकऱ्यांनी विशेषत: अल्प भूधारक शेतकऱ्यांनी निविष्ठा (inputs) खरेदी कमी दरात आणि उत्पादनार्चीी विक्री जास्तीत जास्तत दरात व्हावी म्हणून औपचारिक/अनौपचारिक (जसे शेतकरी उत्पादक कंपनी अथवा संस्था) पद्धतीने एकत्र येणे ही काळाची गरज बनली आहे. त्याचे महत्त्व अर्थतज्ज्ञ, कृषितज्ज्ञ आणि धोरणकर्ते यांच्या पातळीवर ओळखले गेले आहे. परंतु त्याचबरोबर सध्या अस्तित्वात असलेल्या कृषि उत्पन्न बाजार समित्यांसारख्या सरकारी संस्थांचे सबलीकरण आणि आधुनिकीकरण हेही महत्त्वाचे आहे.

शेतीसंबंधित खाजगी अथवा सरकारी संस्थांकडून शेतकऱ्याला उत्तम सेवा मिळणे आवश्यक आहे. तसेच या संस्थांच्या द्वारे शेतकरी कुटुंबाला प्रशिक्षण आणि कौशल्यविकास याद्वारे उद्यमशील बनवणे, दर्जेदार शेतमालाचा पुरवठा होण्यासाठी प्रोत्साहन देणे, शेतमालासाठी देशांतर्गत आणि देशाबाहेर मागणी तिथे पुरवठा करण्यासाठी योग्य बाजार आणि बाजारभाव मिळवून देणे महत्त्वाचे आहे. शेतकऱ्याकडून अंतिम ग्राहकापर्यंत शेतमाल पोहोचण्यासाठी पुरवठा साखळी मजबूत करणे आणि मालाच्या किमतीमध्ये कसणाऱ्याचा हिस्सा वाढवण्यासाठी आणि दलालांचा कमी करण्यासाठी व्यवस्था उभारणे आवश्यक आहे. शेतीमालाच्या बाजारासंबंधी शेतकऱ्यांना सर्वंकष माहिती पुरवणे, जमिनीच्याा माती परीक्षणापासून ते शेतकरी प्रशिक्षण आणि पिकाच्या विक्रीपर्यंत विविध बाबींसाठी नवीन तंत्रज्ञान आणि डिजिटल माध्यमांचा वापर करण्याची आणि या माध्यमांद्वारे जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्याची गरज निर्माण झाली आहे. शेतमाल प्रक्रिया उद्योग आणि विविध प्रकारच्या शेती कंपन्या, स्टार्टअप्स आणि लघु कंपन्यांना आणि शेतीबाहेरील रोजगार निर्मितीला पाठबळ देऊन त्याद्वारे शेतीवरील रोजगारनिर्मितीचा भार कमी करून अर्थव्यवस्थेचा हा कणा बळकट करणे पुढील वाटचालीसाठी श्रेयस्कर ठरेल.

**(लेखक गोखले इंस्टीट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स, पुणे येथे प्रोफेसर आहेत.)**

*आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा*

**लता कोठावळे**

लता एन्ड सन घेऊन येत आहे उद्योगाची व्यवसायाची संधी

**संपर्क:** लता कोठावळे (९६१९३०९३९२)

सर्व प्रकारचे पापड, कुरडईचे प्रकार आणि मिरगुंडाचे प्रकार खाली दिलेल्या पत्त्यावर मिळतील.

मारुती सदन, प्लॉट नं. ५६९, तळ मजला, आगरी समाज हॉल जवळ,

घाटला व्हिलेज, चेंबूर, मुंबई - ४०० ०७१.